# प्रभुतरुण

| वर्ष ४७ | अंक १० | मुंबई | एप्रिल २०१३ | पाने ६ | किंमत रु. १ |
|---|---|---|---|---|---|

(*स्थापना* : तारीख २५ ऑगस्ट १९२३)

**तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?**

www.prabhutarun.org

*संपादिका:* सुहासिनी कीर्तिकर *कार्यकारी संपादक मंडळ* : मिनाक्षी जयकर, मयुरा नायक, संजना कोठारे, वैजयंती कीर्तिकर

*संपादकीय*

## ‘रंगीला रे...’

—सुहासिनी कीर्तिकर

परवा रामवाडीतील राममंदिरात अबीरोत्सवाला गेले होते. श्री अरविंद धुरंधर अगत्याने घरी येऊन आमंत्रण देऊन गेले. म्हटलं, चला; आपण हा ‘अरविंदोत्सव’ समजू. श्री. बाळूगुरुजी म्हणजेच श्री. सिद्धेश मणेरीकर यांचं कीर्तन होतं. जे इतरत्र सगळ्या देवळात दिसतं अलीकडे चित्र; तेच तिथेही होतं. मी गेले तेव्हा फक्त अरविंद धुरंधर दो हात, एक मस्तक घेऊन रामाच्या चरणारविंदी लीन होऊन कीर्तनाला साथ देत होते. मग हळुहळू वीस पंचवीस श्रोते, भक्त जमले. पण त्यामुळं मणेरीकरबुवा नाराज झाले का? छे! अजिबात नाही. उलट ही सद्यस्थिती त्यांनी उमद्या मनानं स्वीकारलेली दिसली. कीर्तन रंगवता रंगवता ते म्हणाले, ‘‘अहो एकाला निद्रानाशाचा विकार झाला. तो गेला डॉक्टरांकडे. डॉक्टरांनी त्याला जालीम उपाय सांगितला. डॉक्टर म्हणाले, ‘तू कीर्तनाला जाऊन बैस. तुला छाऽऽन झोप लागेल.’ तर सध्या कीर्तन म्हणजे डुलक्या घेण्याचं ठिकाण झालंय’’ त्यांचा हा विनोद आजच्या परिस्थितीवर भाष्य करणाराच होता. पण त्यामुळं त्यांनी कीर्तनरंग सोडला मात्र नाही. रंग, रंग. हां.... कीर्तनाचा पूर्वरंग त्यांचा रंगावरच होता.

अबीरोत्सव असल्यानं या अबीरगुलालाच्या रंगापासूनच त्यांनी सुरुवात केली. हिंदुत्व स्वीकारणाऱ्या प्रत्येकानं लल्लाटी कोणता ना कोणता प्रतिकात्मक रंग (टिळा) लावायलाच हवा. आपण शुभाचा म्हणून कपाळी चंदनटिळा लावतो. केशरी गंधानं शरीरातील शक्तीचक्रं चैतन्यमयी होतात. दोन भुवयांमध्ये हे गंध लावल्यानं तो पवित्र रंग आत्म्याला चढतो. कुंकवाचा लाल रंग अवकाशातील आवरणातून आक्रमण करणाऱ्या वाईट प्रवृत्तींचा नाश करतो. दुसऱ्याचं लक्ष वेधून घेणारा हा रंग ‘हरिद्राकुंकूम्’ होत शरीराच्या इतर भागांवर चढा हल्ला होऊ देत नाही. नजरबंदी करण्याची ताकद त्यात आहे. कुणी पांढरे पट्टे उभे-आडवे कपाळी ओढतात. शैव-वैष्णव निदर्शक हे उभे-आडवेपण त्यामागची तत्त्वज्ञानाची पताका फडकत ठेवतात. कुणी ‘अबीर-गुलाल’ लावून रंगतो. अबीर हा सुगंधी आणि निसर्गोपचाराची कुमक घेऊन आलेला. म्हणूनच काळ्या विठोबाने या रंगाची उधळण केली. तो तारक ठरतो; इतकेच नव्हे तर, विचारांना भरकटू देत नाही. ह्या विविध रंगांचं महात्म्य आहे म्हणूनच तर अबीरोत्सव करायचा. रंग नाही लावला तरी काहीजण उदी कपाळी लावतात. अंगाराही म्हणतात त्याला. उदी, अंगारा नसेल तर भस्म लावतात. भस्माचा रंग राखी करडा. पण या जगातून तारून नेण्याचे सामर्थ्य असलेले करडेपण यातच आहे. हे सामर्थ्य सांगणारी गुरुचरित्रातील एक कथाच मग मणेरीकरबुवांनी रंगीत केली. कीर्तनाचा रंग चढत असताना, तालासुराच्या साथीत अशा सार्थ गोष्टी कशाला कुणाला झोप येऊ देतील हो! रसाळपणे त्यांनी गोष्ट खिलवली ती अशी. गावात एक पापी माणूस रहात असतो. निंदा नालस्ती करीत गावभर हिंडणारा, बायकामुलांना उपाशी ठेवून मारझोड करणारा, व्यसनाधीन होऊन चोरीमारी करत, शिंदळकी करत गावभर भरकटत भटकणारा हा माणूस क्रूरकर्माच असतो. शेवटी व्हायचे तेच होते. त्याचं घरदार सुटतं. बायकामुलं त्याची रहात नाहीत. अंगावर धड कपडे नाहीत. व्यसनामुळे शरीराची चाळण झालेली. काहीतरी मिळावं म्हणून तो धडपडत, कोलमडत, झोकांड्या खात अखेर स्मशानात येतो. त्राण नसल्यामुळे तेथेच आडवातिडवा होत लवंडतो. शेजारी एका पुण्यवानाची चिता जळत असते. तेवढ्यात स्मशानातील एक कुत्रं चितेजवळील राखेतून चालत याच्याजवळ येतं. हा निपचित पडलेला. त्याच्या अंगावरून ते चालत जातं. राखेने भरलेले

(पान २ कॉलम १ वर)

*विस्तारीत संपादकीय*

## आठवणींचे टाके

-मिनाक्षी जयकर

नुकताच सोनाली कुलकर्णीचा एक लेख वाचनात आला. सध्या नामशेष होऊ घातलेल्या शिवणसंस्कृतीवर आधारित तो लेख होता. तुटलेली बटणं, हुक्स लावणे, उसवलेली शिलाई दुरुस्त करणे या गोष्टी जशा आता कालबाह्य होत चालल्यात,त्याबरोबर प्रत्येक घरात हटकून असणारा शिवणाचा डबाही गायब होत चाललाय. कारण हल्ली तुटलेली बटणं, हुक्स परत लावायच्या किंवा उसवलेली शिलाई परत तुरपायच्या फंदातच कोणी पडत नाही. त्यापेक्षा तो कपडाच वापरातून बाद करणं हे जास्ती सोपं! असा एकदंर त्या लेखाचा सूर होता.

तो लेख वाचता-वाचता मन आठवणींचे पंख लावून भूतकाळात उडू लागलं; पार आमच्या बालपणात पोहोचलं. आमच्या लहानपणी आई-आत्या आमचे फ्रॉक्स शिवत असत. फ्रॉक शिवायचा म्हटलं की मी आणि माझी बहीण; आम्ही आपापल्या ‘ड्रेस डिझायनर्स’ होत असू. मग त्यावर चर्चा आणि नंतर सर्व संमतीने (म्हणजे आई-आत्या आणि आम्ही) फ्रॉकची फॅशन ठरत असे. घरचा डिझायनर आणि घरच्या घरी शिलाई, त्यामुळे हवी ती कापडं विकत घेऊन त्याचे फ्रॉक्स आम्ही वापरू शकत होतो. अशा कितीतरी मनपसंत फ्रॉक्सच्या आणि त्यामागील इतिहासाच्या रम्य आठवणी पुन्हा जागा झाल्या. केवळ फ्रॉक्सच नाही; तर त्यामध्ये घालायचे पेटीकोटसुद्धा कधी साधे घातले नाहीत. त्यांना कधी घरी बनवलेली क्रोशाची लेस लावलेली, कधी त्यावर थोडंसं भरतकाम केलेलं किंवा कधी अगदीच वेळ नसेल तर विकतची तरी लेस लावलेली असे. किंबहुना तेव्हा तशी ती पद्धतच होती असं म्हटलं तरी चालेल. परकर, पेटीकोट असे ‘प्लेन’ कधी वापरायचे नाहीत. त्यांना लेस लावून किंवा त्यावर थोडेसे तरी भरतकाम करूनच ते वापरायचे. ब्लाऊजसुद्धा हातावर, पाठीवर भरतकाम केलेले घालायचे. आणि हे सर्व घरी केलेल बाहेरून पैसे देऊन करवून घेतलेले नसे. सुट्टी लागली की मुलींचाही लेसेस बनवण्याचा उद्योग सुरू व्हायचा. एखाद्याला बाळंतविडा द्यायचा झाला तर झबली, पांघरूण, स्वेटर सर्व काही स्वत: बनवून द्यायचे. लहान बाळाला कोरी सफेद झबली कशी द्यायची; म्हणून प्रत्येक झबल्यावर थोडातरी कशिदा काढून द्यायचा. कोणी चुकून बाहेरून खरेदी केलेल्या अशा वस्तू दिल्या तर एवढ्या साध्या गोष्टी येत नाहीत म्हणून ती बाई चेष्टेचा विषय होई. कधी एखादं बटण तुटलं, शिलाई उसवली की घरच्या घरी पटकन् दोन टाके घालून तो कपडा परत वापरायला सुरुवात. असे सर्व असताना प्रत्येक घरात शिवणाचे मशीन नाही; तरी शिवणाचा डबातरी असणं अपरिहार्य होतं.

हळुहळू काळ बदलला. जीवनशैली बदलली. तुटलेलं बटण, हुक परत शिवण्याएवढाही वेळ नसेनासा झाला. त्यापेक्षा तो कपडाच बाद करून नवीन विकत घेण्याची प्रवृत्ती वाढली. घरा-घरातील शिवणाची मशीन्स अडगळ होते म्हणून काढून टाकली जाऊ लागली. कारण ती वापरणारी पिढीच आता हळुहळू काळाच्या पड़द्याआड जाऊ लागली. पूर्वी शाळा-शाळांतून मुलींसाठी शिवण हा सक्तीचा विषय होता. आता तेही बदलले. दर्जी संस्कृती लयाला जात तयार वस्तूंचा काळ येऊ लागला. एखाद्याला ‘बटन शिवता न येणं’ हा चेष्टेचा विषय न करता ‘बटन शिवता येतं’ हा कौतुकाचा विषय होऊ लागला. सर्व काही तयार मिळते, मग घरी करायचे कष्ट कोण घेते? ह्या सर्व धबडग्यात घराघरातील शिवणाचा डबा आठवणींच्या आसमंतात कुठेतरी विरून गेला. ‘प्रेमाची गोष्ट’ मधील नायिका म्हणते ना; तसा! ‘चहात विरघळणाऱ्या खारीच्या पापुद्र्यासारखा...’

(पान १ कॉलम २ वरून)

कुत्र्याचे पाय याच्या अंगावर उमटतात. काही वेळाने अन्नान्नदशा झालेला हा क्रूरकर्मा पातकी माणूस मरतो. मेल्यावर मग वर त्याच्या कर्माचा हिशोब होतो. अहो आश्चर्यम्! त्याची रवानगी नरकात न होता स्वर्गपरिसरात होते. त्याला स्वत:लाही आश्चर्य वाटतं. 'मी एवढा पातकी आहे. मला नरकवासच व्हायला हवा.' -असं त्याला वाटतं. पण त्याला वाचवलेलं असतं त्या कुत्र्याच्या पायांनी. नव्हे; नव्हे! त्या पावलांनी आणलेल्या भस्मानं. त्या भस्माची ताकद एवढी की नकळत शरीराला झालेल्या त्या स्पर्शानं त्याला नरकापासून अस्पर्श ठेवले. 'नकळत पद अग्नीवर पडे, न करी दाह असे न कधी घडे' हे वाईट बाबतीत आपण म्हणतो. म्हणजे वामन पंडितांनीच तसं म्हणून ठेवलं आहे. पण इथं नकळत घडलेली कृती, नकळत लागलेला भस्माचा रंग त्याचा उद्धार करून गेला. रंग म्हणूनच महत्त्वाचा.

मंडळी, मणेरीकरबुवांनी असे पूर्वरंगात कीर्तन रंगवले अन् उत्तररंगात स्वामी स्वरूपानंदांचा गुरूरंगात तल्लीन होण्याचा रंग त्यांनी उलगडत नेला. खरंच आहे नं? 'रंगात रंग तो श्याम रंग'पहाण्या राधेची नजर म्हणूनच भिरभिरते. तो 'अवघा रंग एकचि झाला' की मग कोठे राधा, कोठे श्रीरंग? सूरदासानं फार सुंदर चित्र उभं केलंय. रवी घेऊन डेऱ्यातील ताक घुसळत लोणी काढणारी राधागौळण तोंडानं नाव घेत असते लाडक्या कृष्णाचं. पण तल्लीन होऊन नाव घेताना ती इतकी श्री'रंग'मय होत जाते की 'कृष्ण, कृष्ण, कृष्ण' म्हणता म्हणता दुसऱ्याच क्षणी ती बेभान होऊन 'राधा, राधा, राधा' म्हणत रहाते. म्हणजे कृष्ण-राधा वेगळी नाहीतच. कृष्णाच्याच आत्मरंगात रंगून गेलेली ही 'त्रिधा' राधा म्हणजेच कृष्ण. परमात्म्यानं आत्म्याला दिलेली ती अलौकीक रंगमय अनुभूती. जसं ह्या रंगात न्हाऊन गेलं की विसोबा खेचराला विष्णूच्या मंदिरातही जिथं नजर जाईल तिथं, जिथं पाय ठेवील तिथं शंकराची पिंडच दिसू लागली. 'मन आत्मरंगी रंगले' की हा बेभान रंगोत्सव सुरू होतो. 'निजरंग' उधळले जातात. 'अद्वैताची पहाट' फुटते. पंतमहाराज म्हणतात त्याप्रमाणे 'कर्तृत्वाचे असह्य ओझे' मागे घेतल्यावर 'निश्चितीने सहज दत्त भजनरंगी रंगे' अशी अवस्था होते. ज्ञानोबांच्या शब्दात 'अवस्था लावोनि' जाते. 'रंगुनी रंगात साऱ्या रंग' वेगळा रहातच नाही या अद्वैतामुळं. हा आहे रंगोत्सवाचा खराखुरा अर्थ. कीर्तनरंगातून असे रंग उधळत गेले आणि रंगमय होण्यातली अद्वैताची जादू समजली. 'माझा रंग तुला घे, तुझा रंग मला दे' असं म्हणायची वेळच येत नाही मग.

इंदिरा संतांच्या कवितेत तर अशी रंगांची प्रतिमासृष्टीच बहरली आहे. 'त्याच्या' वावरण्यातले अनेक रंग दाखवत एका कवितेत त्या म्हणतात,

'रंग रंग हे जमती, भिनती
मीच होतसे इंद्रधनु
अन् तुझ्या जीवाच्या आकाशावर
अशी सुरंगा रहाते रेलून.'

मीच इंद्रधनु होण्याची एकरुपता आली अनुभवाला की आपणच इंद्रधनु अन् आपणच 'सुरंगा'.

मंडळी, वसंतऋतूत निसर्गही नेहमीच रंगाची लयलूट करत असतो. लहान बाळाच्या लुसलुशीत तांबूस हातासारखी आम्रपालवी, हळदीकुंकवाचा सडा घालणारे बहावा अन् गुलमोहर, वसंताची पताका मिरवणारे उत्फुल्ल पळस, पिवळ्या केशरी रंगाचा स्पर्श करणारी अन् मादकधुंद गंध देणारी सुरंगी, कामवासना फुलवणारी मोगरा-जाई-जुई-मदनबाणांची शुभ्र वळेसरी गझल, कोकीळेच्या तानांची आलापी, आंब्याचा हवाहवासा उबदार स्पर्श-वास-रंग अन् चव! 'वसंतातले फुलाफुलांचे छापील उंची पातळ ल्यावे' असेच वाटणारी ही उत्कटता पालवणारी निसर्गरुपे. त्या रुपांचे रंगगोफ अन् त्या गोफात गुरफटलेले आपण. जादुई कांडी फिरवणाऱ्या या रंगोत्सवाची ही सर्व देखणी रूपे. हे बेधुंद अनुभव. पंचेद्रियांनी भोगूनही असोशी वाढवणारे हे रंग.

या रंगरंगात रंगलेला हा अवघा निसर्ग चला आपलासा करूया. त्याला जपूया अन् खरंच त्याच्या रंगात रंगून जाऊया. आत्मरंगात समरसून जाऊया.

## विठोबा कान्होजी कोठारे चॅरिटीजचे रामवाडी राम मंदीर

दिनांक २३ मार्च २०१३ रोजी मंदिरात श्री अबीरोत्सवानिमित्त ह.भ.प. श्री. सिद्धेश गो. मणेरीकर यांचे रसाळ कीर्तन झाले.

दिनांक २७ मार्च २०१३ रोजी श्री रंगोत्सवानिमित्त गीतरामायणाचा कार्यक्रम झाला. गायक होते श्री. निनाद वसंतराव आजगावकर. त्यांच्या अनेक गीतांना श्रोत्यांनी 'वन्स मोअर' दिला. सर्वांना गुलाबपुष्प आणि कॉफी देण्यात आली. याप्रसंगी खास पाहुणे म्हणून प्रसिद्ध संशोधक व इतिहासतज्ञ श्री. ज. वि. नाईक सपत्नीक उपस्थित होते. क्रांतिवीर चाफेकर आणि रँड वधाचे नुकतेच लावण्यात आलेले म्युरल पेंटिंग यामुळे या मंदिराचा इतिहास अधिक ठळक झाला आहे. भारतातील सर्व राममंदिरांचा आढावा घेणाऱ्या पुस्तकात चाफेकरांच्या वास्तव्याने ऐतिहासिक ठरलेल्या या राममंदिराचा उल्लेख आहे. हा वारसा श्री. प्रताप वेलकर, परिमल तळपदे, रंजन विजयकर, सुदीप कोठारे, विशाल कोठारे हे विश्वस्त जपत आहेत. ही खास गौरवाची आणि उल्लेखनीय बाब आहे. श्री. अरविंद धुरंधर यांचे सेवाभावी कार्यही यामागे आहे. सियावर प्रभु रामचंद्र की जय।

*

## अभिनंदन

❁ श्री. नंदू धुरंधर यांनी लागोपाठ तिसऱ्या वर्षी प्रकाशातील प्रसिद्ध कलाकारांची छायाचित्रे असणारे आगळेवेगळे 'कॅलेंडर' प्रसिद्ध केले. यावर्षीचे हे 'कॅलेंडर' 'टेबलपीस'आहे आणि विविध ऋतुंची संकल्पना त्यांनी राबविली आहे. याविषयी 'स्टार प्रवाह'वर सचिन पिळगावकर, संतोष जुवेकर, मृणाल कुलकर्णी आदींनी प्रशंसोद्गार काढले. या कॅलेंडरवर श्री. आदिनाथ कोठारेंचीही छबी आहे. अप्रतिम छायाचित्रण ही नंदू यांची खासियत. म्हणूनच 'सेलिब्रेटीज'ची रंगपंचमी कॅमेराबद्ध करायलाही त्यांना निमंत्रण होतेच. असाच सातत्याने यशाचा रंग त्यांच्या छायाचित्रणाच्या कलेला लागत राहो. अभिनंदन नंदू!

❁ 'प्रभुप्रभात'च्या संपादिका श्रीमती वंदना प्रमोद नवलकर या २७ एप्रिल रोजी वयाची पंच्याहत्तरी पूर्ण करीत आहेत. त्यांचे कार्य 'अजून यौवनात मी' म्हणत असताना या बातमीवर विश्वास नाही ना बसत? 'कुटुंब सखी'चे अनेक वर्षे यशस्वी व्यवस्थापन केल्यावर त्या अलीकडेच त्यातून बाहेर पडल्या आहेत. पण या सखीने त्या संस्थेचा व्याप शहरभर आणि शहराबाहेरही इतका यशस्वीपणे वाढवून ठेवला आहे की इथून पुढेही वंदना नवलकर म्हणजे 'कुटुंबसखी' हे समीकरण आपल्या मनात कायम राहील. अनेकांच्या त्या आहेतच कुटुंबसखी. म्हणूनच ज्ञातीतील अनेक संस्थात्मक कुटुंबाच्या त्या विश्वस्त आहेत. पाठारे प्रभु सोशल समाज, पाठारे प्रभु महिला समाजाला विश्वस्त या नात्याने त्यांचा आधार आहे म्हणूनच या संस्था नवनवीन उपक्रम उत्साहाने राबवीत असतात. कै. प्रमोद नवलकर यांच्या सर्व सामाजिक कार्याला 'मम' म्हणत त्या वाढल्या. म्हणूनच कै. प्रमोदच्या पश्चातही कुठल्याच समाजकार्यात त्या उण्या पडल्या नाहीत. 'प्रभुप्रभात' याची साक्ष आहे. 'प्रभुप्रभात'तर्फे झालेला खाद्यमहोत्सव, प्रभातचा वर्धापनदिन नेटाने, उत्साहाने आणि जबाबदारीने त्या साजरा करतात. मुलींचा संसार, नातवंडे यांच्या स्नेहमयी कुटुंबात रंगून गेलेल्या आमच्या विजूला (पूर्वाश्रमीच्या विजया मोतीराम विजयकर) ज्ञातीचा दुसरा नेत्र असणाऱ्या प्रभुतरुणातर्फे मन:पूर्वक शुभेच्छा! निरोगी, निरामय आणि अखंड कार्यरत असणारे आनंदी आयुष्य यापुढे तुम्हाला लाभो!

❁ डॉ. सौ. अनिता सुनील कोठारे यांनी डॉ. मीना तालीम यांच्या मार्गदर्शनाखाली 'राष्ट्रकूटाचा इतिहास (महाराष्ट्र व आंध्र प्रदेश)' या विषयावर संशोधन करून 'पीएचडी' मिळवली. 'प्राचीन भारतीय संस्कृती' या विभागाच्या त्या संत झेवियर्स महाविद्यालयात प्रमुख म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी पाली, उर्दू आणि नाणेशास्त्राच्या पदविकाही प्राप्त केल्या आहेत. महाविद्यालयातील अध्यापन कार्याच्या समांतर त्या जे. जे. स्कूल ऑफ आर्टस् येथे सिरॅमिक्स शिकवतात. म्युझियम सोसायटी ऑफ मुंबईच्या त्या चिटणीसपदी आहेत. अपंग, कॅन्सरग्रस्त मुलांसाठी कार्यशाळा घेऊन त्या समाजकार्यात योगदान देतात. अनेक संशोधननिबंध त्यांनी सादर केले असून नुकत्याच त्या 'होलोकास्ट' परिषदेसाठी इस्त्रायलला जाऊन आल्या. डॉ. सुनील आणि डॉ. अरविंद राणे या मात्यापित्याच्या पावलावर पाऊल टाकून, यजमान श्री. सुनील पांडुरंग कोठारे यांच्या पाठिंब्यामुळे डॉ. अनितांनी हे यश मिळवले. त्यांची पावले अशीच यशाच्या शिखराकडे चालत राहोत. अभिनंदन.

❁ श्रीमती प्रमिला आणि मधुकर तळपदे यांची कन्या डॉ. सौ. चंद्रा मोहंती यांचे 'वॉर्स, बॉर्डर्स अँड एम्पायर्स- द व्हायोलन्स ऑफ सिक्युरिटी रेजीम' या विषयावर पुणे विश्व विद्यालयात व्याख्यान झाले. अभिनंदन.

*

## पाठारे प्रभु महिला समाज

❁ महिला समाजाच्या २४ फेब्रुवारी १३ रोजी झालेल्या बक्षिस समारंभात सौ. बिंबा मनोज नायक यांचा 'ऑल इंडिया बिझिनेस प्रोफेशनल होम बेकर्स'च्या 'चॅलेंज २०१३'मध्ये रौप्यपदक प्राप्त झाल्याबद्दल गौरव करण्यात आला. सौ. बिंबा यांचे अभिनंदन.

❁ २३ एप्रिल १३ रोजी खार येथील सांस्कृतिक केंद्र सभागृहात सायंकाळी ४ वाजता चैत्रातील वासंतिक हळदीकुंकू समारंभ होणार आहे. याप्रसंगी देवीपुढे लोभस आरास करण्यात येईल. या निमित्ताने अशोक शेवडे व प्राची देवस्थळी 'आठवणी चंदेरी सोनेरी' हा कार्यक्रम सादर करणार आहेत. याच दिवशी महिलांसाठी पुढील स्पर्धा घेण्यात येतील:- १) कै. सौ. सुनंदा वाझकर, कै. हिराबाई तळपदे, कै. श्रीमती लतिका विजयकर स्मरणार्थ आणि श्रीमती वंदना प्रमोद नवलकर पुरस्कृत फॅन्सी ड्रेस स्पर्धा. यात १५ वर्षाखालील मुली आणि मोठ्या भगिनी असे दोन गट असतील. २) कै. कमळाबाई राव, कै. मालतीबाई विजयकर, कै. श्रीमती सुशीला वेलकर, कै. श्रीमती मोहिनी कोठारे, कै. कुसुम प्रधान आणि कै. सौ. पिरोजबाई राणे स्मरणार्थ टाकाऊ वस्तूपासून कलात्मक कृती करण्याची स्पर्धा. कलाकृती स्पर्धेच्या ठिकाणी करावयाची आहे.

(पान ५ कॉलम ४ वर)

लेखांक-४

## फुलता नलिनी दल

# सु- सुगरिणीचा

— नलिनी तळपदे

तर काय- अलीकडे या दूरचित्रवाणीवर सुगरिणींचं नुसतं पेव फुटलंय. तुम्हालाही माझ्यासारखंच वाटतं ना? आधीच मालिका पहाताना येतात नाकीनऊ, त्यात सुगरिणींच्या हातचं हे खाऊ की ते खाऊ? जवळ जवळ सर्वच निर्मात्यांना आपली वाहिनी अधिकाधिक खमंग, रूचकर करण्याचं खूळ लागलेलं दिसतंय. हरकत नाही, दुसऱ्यावर मात करणं हा मनुष्यस्वभावच आहे. पण आमचं पहाणाऱ्यांचं काय? त्याचा नको का विचार व्हायला?-

'झी' वाहिनीवर दुपारी बरोब्बर एक वाजून तीस मिनिटांनी 'आम्ही साऽऽरे खवय्ये'चं शीर्षकगीत सुरू होतं. या कार्यक्रमाचे सूत्रधार प्रशांत दामले यांच्या दिलखुलास वागण्या बोलण्याने हा कार्यक्रम खऱ्या अर्थाने प्रेक्षणीय आणि रंगतदार होतो हे खरं असलं तरी- त्याचवेळी 'ई' वाहिनीवर कढईतल्या पदार्थाला फोडणी दिल्याच्या चुर्रर आवाजानं 'मेजवानी'चं चमचमीत दालन खुलं होतं. आता डोळे दोन असले तरी दोन वाहिन्यांवरचे दोन पदार्थ एकाचवेळी कसे पहाता येतील? मग हातात रिमोट घेऊन खवय्येचं साहित्य आणि मेजवानीची कृती बघून दोन्ही वाहिन्या पाहिल्याचं समाधान मानावं लागतं.

अर्थात हे साहित्य कागदावर उतरवलं जात नाही. कृती तर नाहीच नाही. त्यामुळे पदार्थांचा गोंधळ होण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. त्यानंतर तासाभरानी अडीच वाजता 'मी' मराठीवर 'अन्नपूर्णे सदापूर्णे'सह लज्जतदारची धून ऐकू येते. 'ही नवी रेसीपी उपवासाऽऽची' शाकाहाऽरी, मांसाहाऽरी पदार्थांची लज्जत नुसत्या डोळ्यांनी पाहून होते ना होते तोवर 'ई' वाहिनी आपली इज्जत सांभाळत खाद्यभ्रमंतीचा पसारा मांडते. त्यानंतर सह्याद्रीवर 'रुचिरा', सामवर 'सुगरण'. बाई बाई बाई; हे फक्त मराठी वाहिन्याचंच हं. हिंदी वाहिन्यांवर तरला दलाल, संजीव कपूर या पाककलेतील खाशा स्वाऱ्या अधूनमधून मुक्कामाला येतात ते वेगळंच.

आता तुम्हीच सांगा, खास आमचा विचार करून आमच्या सोयीसाठी निर्माण केलेल्या या मालिका आम्हीच बघितल्या नाही तर मालिकांचा 'टीआरपी' कसा वाढेल?

निर्मात्यांचाही थोडा विचार करायला हवा नाही का? प्रश्न आहे तो वेळेचा, आणि ह्याच विषयावर घरात असलेल्या पुस्तकांचा.

अगदी लक्ष्मीबाई धुरंधरांच्या 'हजार पाकक्रिया'पासून कमळाबाई ओगले, मंगला आठवलेंच्या 'रुचिरा', 'अन्नपूर्णा', अमर राणे यांच्या 'सोप्या पाककृती', शिवाय संजीव कपूर, तरला दलाल यांची चविष्ट पदार्थांची आकर्षक वेष्टनातील पुस्तकं, मराठी, इंग्रजी, हिंदी... काही विचारू नका. अगदी अलीकडे आनंदमेळाव्यात घेतलेलं प्रमिला तळपदेंचं पाठारे परभांच्या पाककृतींचं इंग्रजी पुस्तक या मेळाव्यात सुखनैव नांदत आहे.

ही पुस्तकं प्रकाशित झाली त्यावेळी वाहिन्यांवर उठसूट हे प्रकार दाखविले जात नव्हते आणि तसं पाहिलं तर वाचनापेक्षा प्रत्यक्ष कृती पाहून ती मनात ठसते. त्यामुळे ही सर्व पुस्तकं कपाटात आणि आम्ही खाद्यपदार्थांची प्रात्यक्षिक बघत दूरचित्रवाणीसमोर बसून रहातो आरामात. तसं वेळेचं भान आम्हालाही असतं. खोळंबलेली कामं आवरण्याची वाट पहात असतात. तरीही जे आपल्या हातून होण्याची शक्यता नाही ते नुसतं पहायला काय हरकत आहे, असं वाटून आम्ही आमचा वेळ सत्कारणी लावतो (की वाया घालवतो?)

त्यात आणखी मध्यंतरी महाराष्ट्रातील वेगवेगळ्या ठिकाणांहून आलेल्या सुगरिणींची निवड करून त्यातून 'महाराष्ट्राची सुगरण' निवडण्याची स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. त्यात वावगं काहीच नाही. अधूनमधून पाककलेतील कौशल्य दाखविणाऱ्या अशा स्पर्धा व्हायलाच हव्यात आणि आमच्यासारख्या या कलेत अनभिज्ञ असणाऱ्यांनी त्याचा जिभेनी नाही तरी डोळ्यांनी आस्वाद घ्यायलाच हवा. त्यासाठी थोडा वेळही द्यायला हवा. (हातातली कामं टाकून).

इथे काही पुरुषांचे पाककौशल्य पणाला लागतं बरं का- पाककलेत पारंगत असलेली संजीव कपूर, नीलेश लिमये, विष्णू मनोहर, देवव्रत जातेगांवकर यांच्यासारख्या नामवंतांच्या भेटीगाठी या वाहिन्यांद्वारेच तर आपल्याला घेता येतात. त्यातही जातेगावकरांचं वेगवेगळ्या भाज्यांवरचं कोरीव काम इतकं अप्रतिम असतं की किती पाहिलं तरी समाधानच होत नाही. त्यांच्या या कौशल्याला माझा सलाम!.

काही आहारतज्ज्ञांच्या पाककृतीही उपयुक्त असतात. 'लज्जतदार'मध्ये शेवटी सांगितले जाणारे आयुर्वेद तज्ज्ञांचे आरोग्यविषयक सल्ले व 'खाद्यभ्रमंती'मध्ये खाद्यपदार्थां- बरोबरच त्या त्या गावांची वैशिष्ट्यं सांगणारी प्रेक्षणीय स्थळं दाखविण्याची पद्धतही मनोरंजक आहे.

या वाहिन्यांच्या वाहत्या गंगेत हात धुवून घेण्याचं आपल्या पाठारे प्रभु भगिनींनी विशेष मनावर घेतलेलं दिसत नाही. खरं तर आपल्या जातीतील खाद्यपदार्थ किती रूचकर आहेत. ते इतर कुणाला माहीत नाहीत. जमणारही नाहीत. पण हे पदार्थही अलीकडे बाहेरच्या खाण्या-मुळे नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. आपलं अननसाचं सांबारे, गोडी बटाटी, सागू याची अवीट गोडी आपणच सांगू शकतो. आपल्या ज्ञातीच्या लग्नात जेवणावळीत त्यांना मानाचं पान आणि स्थान दिलं जायचं. पण अलीकडे पंजाबी, चायनीजचं खूळ वाढल्यापासून हे पदार्थही दिसेनासे झाले आहेत. हे झालं शाकाहारी. पण आपल्या मांसाहारातही तळणाखेरीज भुजणं, सोलाचं, पुरणाचं, खडखडलं, आटलं असे तोंडाला पाणी सुटणारे कितीतरी... शिवाय पंगोजी, मुंबरं, केरवळ्या- एक ना दोन...

तुम्ही म्हणाल, हो- आमचंच आम्हाला काय सांगता? मी सांगते अशासाठी की आपल्या ज्ञातीतील पाककुशल सुगरिणींनीही दूरचित्रवाणीवर प्रक्षेपित होणाऱ्या वेगवेगळ्या खाद्यविभागात भाग घेऊन आपलं पाककौशल्य दाखवायला काय हरकत आहे?

नुकत्याच झालेल्या पाठारे प्रभु खाद्य महोत्सवात दिसलेली सुगरणपणाची झलक अवघ्या महाराष्ट्राला दिसू दे.

आणखी एक- एका वाहिनीवर खाद्यपदार्थाची कृती चालू असताना दुसऱ्या वाहिनीवर वेगवेगळी शीतपेयं दाखविली जातात तेव्हा अक्षरशः हे खाऊ की ते गिळू असं वाटायला लागतं.

तसं पाहिलं तर घर बसल्या एवढ्या पूर्णब्रह्माचं दर्शन आपल्याला होतं- हेही नसे थोडके!

कोणताही खाद्यपदार्थ जिभेनी चव घेण्याआधी नुसतं पाहूनच मन प्रसन्न होऊन तो खाण्याची इच्छा झाली पाहिजे असं म्हणतात. पण इथे विविध वाहिन्यांवर सुगरिणींच्याकृतीआधी त्या करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या काचेच्या साहित्यांनीच मन वेधून घेतं. अतिशय आकर्षक, मनोवेधक असतं हे काचसामान. त्यात सुगरिणींनी केलेले पदार्थ अधिक शोभीवंत दिसतात.

इथे आपल्या चवींचा प्रश्नच येत नाही. आपल्याला मिळतं ते फक्त दृष्टीसुख.

तरीही मंगला खाडिलकरांसारख्या पाककलेत मुरलेल्या आणि सेलिब्रेटींच्या नावाखाली नुकत्याच स्वयंपाकघरात शिरलेल्या सुगरिणींच्या पाककृतीला आमचा मानाचा मुजरा!

जाता जाता दूरचित्रवाणीवर खाद्यपदार्थांच्या मालिका प्रक्षेपित करणाऱ्या सर्व निर्मात्यांना माझी कळकळीची विनंती आहे की, आम्हाला 'खाऊ की गिळू' करायला लावणाऱ्या प्रक्षेपणाला कुणीतरी आवर घाला. कारण आठशे खिडक्या, नऊशे दारं, वैतागलो आम्ही तर तुमचं नाही खरं!

*

---

### परीक्षेतील सुयश

**पीएचडी**

सौ. अनिता सुनील कोठारे

**एमबीए**

सौ. त्वरिता संजय दळवी, प्रथम वर्ग

**एम.डी. (प्रथम वर्ष)**


डॉ. कु. दीपिका प्रदीप वेलकर, प्रथम वर्ग

**एलिमेंटरी ड्रॉईंग**

निशांत अतुल तळपदे, बी ग्रेड

---

**हसरी रेखा** -प्रदीप कोठारे



# युवामंच

## श्रीलंकेची स्वारी

**-सुहासिनी सुहास कोठारे**

नेहमी आपण कितीतरी सुमधुर गाणी ऐकत असतो. त्यातील बरीच गाणी आपल्या मनात कायम घर करून राहतात. त्यातीलच एक पं. भीमसेनजींनी आपल्या सुमधुर आवाजात गायिलेले 'रम्य ही स्वर्गाहून लंका' हे गाणे मला खूपच आवडते व आमच्याकडे त्याची रेकॉर्डही आहे. किती वर्षे ते गाणे ऐकत आहे. त्या गाण्याची गोडी अवीट आहे. पण त्या गाण्यातील लंकेत आपल्याला कधी जाण्यास मिळेल असे वाटले नव्हते. अचानक श्रीलंकेला जाण्याचा योग आमच्या विहंगच्या माधुरीमुळे आला. तिच्या बँकेतील मैत्रिणी, ती स्वत: व मी अशा आम्ही दहाजणी श्रीलंकेला निघालो.

सहार विमानतळावर कोलंबोला जाणाऱ्या विमानात पाऊल टाकताक्षणीच हवाईसुंदरीने `AYUBOWAN" (May you live Longer) असा आशीर्वाद दिला. त्यानंतर श्रीलंकेत गेल्यावरदेखील प्रत्येक ठिकाणी, प्रत्येक दुकानात हा 'आयुष्मान भव.'चा आशीर्वाद घेतच राहिलो. आम्ही सर्वजणी समवयस्क असल्यामुळे आमची सर्वांची मस्त गट्टी झाली. ही सहल त्यातील एका मैत्रिणीच्या ओळखीने व्यवस्थित आरक्षित केली होती. कोलंबो विमानतळाबाहेर सहलीची बस व टूर गाईड हजर होते. तेथूनच आमची सहल सुरू झाली. श्रीलंकेच्या कँडी शहरातील एका आलिशान हॉटेलमध्ये पोचलो. प्रथम KANDY NUWARAELIYA, BENTODA व परत कोलंबो अशा सर्व ठिकाणी आलिशान राहण्याची व पोटपूजेची देखील सुंदर व्यवस्था होती. दिवसभर बसमधून प्रेक्षणीय स्थळांना भेटी देऊन रात्री आमचा हॉटेलमध्ये मुक्काम असायचा. हॉटेलमध्ये एकीच्या रुममध्ये सर्वजणी जमून हास्यविनोद, गप्पा, गाणी असा चिवचिवाट चालायचा. एकदा आम्हाला बाजूच्या रूममधून 'हळू बोला' म्हणून ताकीद मिळूनही दार बंद करून आमचे 'हां हा हू' चालूच. कधीतरी पत्त्याचा डावदेखील खेळत असू; पण तोंडाची बडबड चालूच. लंकेत आलो होतो ना; त्यामुळे दहाजणींची वटवट चालूच असे. सर्व प्रवास बसमध्ये असल्यामुळे बसमध्ये गाण्यांच्या भेंड्या, नाटकांच्या, सिनेमांच्या नावाच्या भेंड्या; ह्यात वेळ कसा जायचा ते कळतच नसे. आमच्यापैकी एक सौ. उषा भोळे म्हणून होती. तिचा आवाज गोड होता. शिवाय तिला शास्त्रीय गायनाची चांगलीच समज होती.

श्रीलंकेत भगवान बुद्धाची बरीच मंदिरे आहेत. एका मंदिरात भगवान श्री गौतमबुद्धांचा एक 'पवित्र दात' एका बंद पेटीत ठेवलेला असून त्याचे दर्शन घेण्यासाठी बरेच लोक येत असतात. कँडीला आम्हाला रत्नाची फॅक्टरी व रत्ने कशी गोळा करतात ते व्हिडियोच्या सहाय्याने दाखविले. खरे माणिक, पाचू, नीलम बघून डोळे दिपून गेले. सर्व महिला असल्यामुळे भरमसाट किंमती असूनही बऱ्याचजणींनी खरेदी केली. एका ठिकाणी लाईफगार्ड जॅकेटस् घालून मस्तपैकी बोटिंग केले. बेबी हत्तीची देखभाल पाहिली व आपल्या छोट्या मुलांप्रमाणे त्यांची पाण्यातील मस्ती पाहून मजा वाटली.

कँडीमधून `NUWARA ELIYA'ला जाताना वाटेत दीडशे वर्षांपूर्वीची `Glenloch Tea Factory' बघितली. `NUWARA ELIYA' हे हिलस्टेशन असून समुद्रसपाटीपासून सहा हजार फूट उंच आहे. तेथे युरोपप्रमाणे छोटे छोटे युरोपियन पद्धतीचे बंगले असून ह्या शहराला 'मिनी युरोप' असेही म्हणतात. `NUWARA ELIYA' ला जाताना वाटेत सुंदर धबधबे बघावयास मिळाले. येथून जवळच असलेल्या `Ramboda' येथील अनजनीर देवळामध्ये जाऊन राम, सीता व हनुमंताचे दर्शन घेतले.तेथे जवळ दगडी कड्याच्या उतरणीवर 'हनुमंताच्या पावलाचे ठसे' पाहवयास मिळाले. कुणी नाके मुरडतील; पण आम्ही सर्वजणी मिळून त्या मंदिरात रामरक्षा म्हटली.

`NUWARA ELIYA' शहरातून आम्ही `BENTODA'ला गेलो. जाताजाता एकेठिकाणी कासवांचे संगोपन कसे करतात ते बघितले. छोटी छोटी तळहाताएवढी कासवे हातात घेऊन काहींनी फोटोदेखील काढले. `BENTODA'ला आमचे राहण्याचे हॉटेल समुद्रावरच होते. समुद्रामध्ये मोठमोठ्या गर्जना करीत नागफणीसारख्या उत्तुंग लाटा येत होत्या. ह्यावेळी 'सागर किनारी वाजविती डंका' असेच वाटते. अशी समुद्राची गाज ऐकताना आम्ही मंत्रमुग्ध झालो. समुद्रस्नान नाही; तरी पाण्यात उभे राहून आम्ही समुद्राला पदस्पर्श मात्र केला. श्रीलंकेची सर्व रमणीयता त्या अथांग सागरातच आहे.

सहलीच्या शेवटच्या दिवशी खूपच वाईट वाटले. कांदिवली, बोरिवली, मालाड, जोगेश्वरी, अंधेरी अशा वेगवेगळ्या ठिकाणांहून आलेल्या आम्ही सहा दिवस खूप मजा केली. एवढ्या दिवसात आमच्या दहाजणींची एकत्रित एक जुडी असावी तशी गट्टी झाली होती, ती मुंबईच्या विमानतळावर विखुरली गेली. लंकेहून 'सोन्याच्या विटा' आणल्या नाही तरी रम्य लंका पाहून तृप्तमनाने सर्वजणी आपापल्या स्वगृही परतलो.

## फजिती

**—अजित मानकर**

घड्याळाचा वेळ योग्य प्रकारे न पाळण्याने काय विचित्र प्रसंगांना तोंड द्यावे लागते ते माझी पत्नी तेजस्विनीपेक्षा दुसरे कोणीही जास्त चांगले सांगू शकणार नाही. तिचे निवडक तीन किस्से मी आता तुम्हाला नमूद करणार आहे. अर्थातच सर्व सत्यघटना असल्यामुळे माझ्यावर कोणतीही कायदेशीर कारवाई ती करू शकणार नाही ह्याची मला पूर्ण खात्री आहे!

३५ वर्षांपूर्वी जेव्हा मी एका परकीय उद्योगामध्ये काम करत होतो, तेव्हा मला शनिवार, रविवार पूर्ण सुट्टी असायची. त्यामुळे शुक्रवार संध्याकाळपासूनच आमचा आठवड्याचा शेवट साजरा होत असे. अशाच एका शुक्रवारी ६.३० वाजताची संध्याकाळची मी आमची दोन रिगल सिनेमाची टिकीटे काढून आणली होती. जेम्स बाँडचा 'फ्रॉम रशिया विथ लव्ह' हा मोठ्या लांबीचा चित्रपट तिथे लागला होता. शिरस्त्याप्रमाणे वरळी ऑफिसमधून सुटून मी रिगलला ६.३०च्या आधीच पोहोचलो व आमच्या बाईसाहेबांची वाट पहात एका कोपऱ्यात उभा राहिलो. सिनेमा नवा असल्याने तुफान गर्दी जमली होती. दोनही तिकीटे माझ्या खिशातच असल्यामुळे बाईसाहेब येईपर्यंत वाट पहाणे एव्हढेच माझ्या हातात होते. घंटा झाली व मंडळी थिएटरमध्ये स्थानापन्न झाली तरी बाईसाहेबांचा पत्ताच नाही. तब्बल ७.४५ वाजता बाईसाहेब रस्ता ओलांडून येताना मला दिसल्या. जसे आम्ही थिएटरमध्ये प्रवेश करणार तोच प्रेक्षकांचा प्रचंड लोंढा मध्यंतर झालेले असल्याने बाहेर पडू लागला. तात्पर्य काय, की आमच्या नशिबी मध्यंतरानंतर सिनेमाचा दुसरा राहिलेला भाग पहाणे नशिबी आले. त्यामुळे हिरो कोण आणि व्हिलन कोण हेच आम्हाला पुढचा अर्धा तास समजेनासे झाले होते.

ह्याच पद्धतीने पुन्हा दुसरा प्रसंग आला. आम्ही दोघे लोणावळ्याकडे जात होतो तेव्हा एका शुक्रवारी दख्खनच्या राणीची ५.०५ला सुटण्याची दोन तिकीटे माझ्या खिशात होती, कारण रेल्वे एकाच कागदावर दोघांची नावे छापत असते. मी नेहमीप्रमाणे वेळेवर व्हीटी स्टेशनवर पोहोचलो. जसजसा गाडीचा सुटण्याचा वेळ जवळ येऊ लागला पण आमच्या बाईसाहेबांचा ठावठिकाणा कळायला काहीही मार्ग उरला नाही. तसे मी पटकन May I help youच्या टेबलावर जाऊन एक चिठ्ठी लिहिली आणि तेजस्विनीला कळविले की, गाडी पकडून मी लोणावळ्याकडे जात आहे. तू नवीन टिकीटे काढून मागच्या गाडीने यावेस. माझी तिकीटे प्रथम वर्गाची महागडी असल्यामुळे मला दख्खनची राणी सोडवत नव्हती. बाईसाहेबांचे वर्णन करून मी त्या टेबलावरच्या बाईला परिस्थितीची योग्य कल्पना दिली. बाईसाहेब त्यानंतरच्या गाडीने धापा टाकत लोणावळ्याला कश्याबश्या पोहोचल्या!

यावर्षी बाईसाहेब LIONS CLUBच्या अध्यक्ष (President) आहेत. परवाच्या १५ ऑगस्टला सुपारीबाग शाळेमध्ये आमच्या Club तर्फे नेहमीप्रमाणे झेंडा वंदनाचा ८.०० वाजताचा कार्यक्रम बाईसाहेबांच्या हस्ते होणार होता. क्लबचे सर्व इतर पदाधिकारी व सभासद आणि शाळेची मुले आणि शिक्षकवर्ग शिस्तीत कार्यक्रमाला उभे राहिले. बाईसाहेब मात्र अध्यक्ष असूनही ८.३० वाजता शाळेत पोहोचल्या. तोपर्यंत इतर पदाधिका-यांनी झेंडावंदनाचा कार्यक्रम बरोबर वेळेवर उरकून घेतला होता. सबब सर्व मंडळी शाळेच्या कंपाऊडबाहेर पडत होती आणि त्या मुहूर्तावर आमच्या मंडळींची सर्वांबरोबर औपचारीक भेट झाली.

असो. असे शंभरच्या वर किस्से माझ्याकडे सांगण्यासारखे आहेत. पण तूर्तास एव्हढेच पुरे. मला आता बेकायदेशीर परिणामांची चिंता ह्या घडीला लागून राहिली आहे. मी एव्हढे सर्व तुम्हाला सांगून मोकळा झालो, पण ह्यानंतर काय प्रसंग माझ्यासमोर वाढून ठेवला असेल त्याची आपण कल्पना केलेलीच बरी.

*

### पाठारे प्रभु सोशल समाज

१२५वा वर्धापन दिन आणि पुरस्कार सोहळ्याचे दिनांक ११ एप्रिल रोजी आयोजन करण्यात आले. या सोहळ्याचे अध्यक्षस्थान डॉ. श्रीमती मीनाक्षी शिवनाथ देसाई यांनी भूषविले. या सोहळ्याचा वृत्तांत पुढील अंकी.

लेखांक ४

# मनातलं

-सौ. उज्ज्वल र. ब्रह्मांडकर

एप्रिल महिना उजाडला की माझं मन एकदम भूतकाळात म्हणजे शाळा-कॉलेजच्या दिवसांमध्ये जातं. 'सुरंगीचा वास... वासवाली सुरंगी' ही सुरंगीचे ताजे हार घेऊन येणाऱ्याची हाक हिंदू कॉलनीभर गुंजत राहायची. नी त्या हाकेच्या प्रतिसादाची खूण असलेले ते सुरंगीचे गजरे तो सीझन संपेपर्यंत माझ्या व आईच्या केसांवर विराजमान व्हायचे. सुवासिक फुलांचा अत्तरगंध उधळणारा, हरतऱ्हेच्या रंगांची फुलांवर पखरण करणारा नी कुहूकुहूची हाक मारणारा हा महिना वसंत ऋतू आल्याची साक्ष देणारा. तरीही मागच्या डिसेंबरपासून एक टोचणी मनाला लागली आहे.

मागच्या डिसेंबरमध्ये आर्चिजच्या दुकानासमोरून जात असताना दुकानाच्या बाहेर सुमारे चार वर्षांचा मुलगा आईसोबत उभा असलेला दिसला. त्याच्या हातात एक सुंदर गुलाबी रंगाचं फरचं बेअर होतं. (अस्वल म्हटलं तर मनात काही सेकंद प्रश्नचिन्ह उभं राहतं. बेअर या शब्दाचीच आता खूप सवय झालीय.... हे जरा विषयांतर झालं) त्या मुलाची आई म्हणाली, 'बघ, सांताक्लॉजनं तुला किती छान गिफ्ट दिलंय नं?' मुलगा बहुधा नाखूष असावा. तो पटकन् म्हणाला, 'त्याला पन्नास रुपये दे आणि ह्याच्याहून मोठं बेअर द्यायला सांग नं!'

कशाचं द्योतक आहे हे? त्या लहान मुलालासुद्धा असं वाटतं की सांताक्लॉजच्या हातावर पैसे टेकवले की तो आपलं ऐकेल. कोणतीही गोष्ट हवी असेल तर कोणतीतरी वस्तू द्यावी लागते. फुकट काहीही मिळत नाही. परीक्षेत पहिलं यायचं असेल तर आपला वेळ, शक्ती अभ्यासावर खर्च करावी लागते. कोणत्याही गोष्टीला मोबदला द्यावा लागतो. आम्ही लहानपणी एवढंच शिकलो. पण आताची पिढी ह्याचा वेगळाच असणारा अर्थ जाणते. लाच दिली तर आपलं एरव्ही न होऊ शकणारं किंवा नियमानुसार वेळ घेऊनच होणारं काम पटकन्, बिनबोभाट होऊ शकतं ही वस्तुस्थिती आता अपवाद राहिलेली नाही. उलट तोच नियम बनू लागलाय. पैसे देऊन काहीही विकत घेणारे त्या मुलाचे आईवडील कदाचित् एरव्ही खरंच नियमानुसार वागणारे असतीलही, पण पैसे दिले की काम होणारच ही खात्री त्या मुलाला आहे. आपल्याला एवढंच बेअर मिळू शकतं ही वस्तुस्थिती त्या बालमनाला स्वीकारायला खूप कठीण वाटत होती. तो आईला पैसे द्यायला सांगत होता. ते पैसे म्हणजे खरंच एका मोठया बेअरची किंमत होती की पैशात तो मुलगा त्या सांताक्लॉजचं इमान विकत घेऊ पाहत होता ते कोण जाणे. त्या मुलाला असं काही करण्यात काही वावगं आहे हेच कळत नव्हतं.

सगळीकडे हेच चित्र हल्ली दिसतं. आताच्या छोट्या मुलांसमोर हीच परिस्थिती आहे. म्हणून ती मुलं मोठी झाल्यावरही तोच चुकीचा वसा पुढे नेतील पण त्यांच्या आईवडिलांची पिढी तर लहानपणापासून असं काही शिकली नव्हती नी तरीही ते असे वागतायत ह्याचा अर्थ आताची परिस्थिती त्यांना बदलवतेय. हव्या त्या कॉलेजमध्ये ॲडमिशन मिळविण्यासाठी खऱ्या हुषार मुलांचे आईवडिलसुद्धा पैसे देऊन मॅनेजमेंट सीट मिळवायला बिनदिक्कतपणे तयार असतात. हल्लीच्या जीवघेण्या स्पर्धेत मुलांची फक्त हुषारी उपयोगी नसते. तीच गोष्ट नोकरीमधल्या बढतीची. तिथेही खूप जीवघेणी स्पर्धा चालू असते. माझ्या माहितीतल्या एका मुलीच्या नवऱ्याला ह्या स्पर्धेमुळे ॲटॅक आला. नशीब बलवत्तर म्हणून तो वाचला. नाहीतर वयाच्या पस्तिशीच्या आधीच त्याला परलोकी जावं लागलं असतं. खाजगी कंपन्यांमध्ये हेच चित्र दिसतं. अत्यंत वाईट प्रथा काही ठिकाणी चालू आहे. प्रत्येक वीकएंडच्या आधी काही टीमलीडर्स आणि स्त्री-पुरुष कर्मचारी ह्यांच्यात ठरवलं जातं की कोणाचं घर त्या वीकएंडला रिकामं आहे. पुढचं मी सांगण्याची गरज नाही. ह्या गोष्टीला अपवाद असणारे सदाचारी टीमलीडर्स आणि कर्मचारी मागे राहतात. दुसरे बढती किंवा इंसेंटिव्ह बोनस जादा प्रमाणात प्राप्त करतात. जे कर्मचारी मागे राहतात ते शंभर टक्के स्वच्छ असूनसुद्धा 'मुळीच स्वच्छ नाहीत कारण त्या विशिष्ट क्षेत्रात काम करतायत' हा ठाम विश्वास ह्या कार्यक्षेत्राच्या बाहेरच्या लोकांना उगीचच वाटत असतो.

सतत असं होत राहिलं की सदाचाराला एकतर काळिमा लागतो किंवा ते कर्मचारी दुसऱ्या प्रकारची नोकरी शोधतात. मनात एकच असतं की सगळीकडे असं नसतं. हे अगदी थोड्या प्रमाणात खरं आहे. तशी नोकरी त्या माणसाला मिळाली तर त्याला जगण्याचा हुरूप येतो. चांगुलपणावरचा त्याचा विश्वास वाढतो. पण किती काळ? तिथंसुद्धा वाईट वर्तणुकीचे सहकारी आले तर हाच चांगुलपणावरचा त्यांचा विश्वास कापरासारखा उडून जातो.

एवढंच, 'काहीतरी मिळवायचं तर काहीतरी गमवावं लागतं' हेच खरं ठरतं. तसं म्हटलं तर आपणच आपल्या मुलांना आपल्याही नकळत त्यांच्या लहानपणापासून हेच शिकवतो. थोड्या वेगळ्या शब्दात-मुलं असं शिकतात की आपण काही गमावतोय त्याच्या बदल्यात आपल्याला काहीतरी मिळणार आहे. नोकरी करणाऱ्या स्त्रियांना रोज त्यांची मुलं ऑफीसमध्ये जाण्यास अडवतात. त्यांची बालमिठी सोडवताना 'मी ऑफीसमधून येताना चॉकलेट आणीन हं. आता मला जाऊ दे.'- ही आईची अजिजी असते. मुलंसुद्धा थोड्या काळानंतर ही सौदेबाजी शिकतात. 'मला रिमोट कंट्रोलची मोटार आणशील?हो म्हण. नाहीतर मी तुला जाऊ देणार नाही.' मोटारीची जागा दुसऱ्या दिवशी दुसरी वस्तू घेते. आईला 'हो' म्हणण्याखेरीज गत्यंतर नसतं. आईला वाटतं- लहान आहे. संध्याकाळपर्यंत विसरेल. म्हणून ती रिकाम्या हातानं घरी परतते. दारात एक पाऊल टाकताच एक चिमुकला हात पुढे होतो नी विचारतो, 'मोटार आणलीस?' किंवा 'गोष्टीचं पुस्तक आणलंस?' आई बिचारी निरुत्तर होते. तिला खूप अपराधी वाटतं. मूल रागावून बसतं. त्याची भरपाई दुसऱ्या दिवशीच्या आमिषानं होते. हेच मुलांनी अभ्यास करण्याबाबत, चांगली वर्तणूक ठेवण्याबाबत घडतं नी हे चक्र सुरूच राहातं. प्रत्येक माणसाच्या मनात चांगले तसेच वाईट विचारही असतातच. फक्त त्यातले कोणते विचार जोपासायचे नी तडीला न्यायचे ते आपल्यावर अवलंबून असतं अशी विचारसरणी आता कालबाह्य ठरतेय.

आपण लाच दिली नाही तर दुसरा देणारच. मग आपणच लाच देऊन आपल्याला हवं ते मिळवण्यात गैर काय? हा आणि फक्त हाच विचार प्रबळ ठरतो किंवा कधी कधी नाईलाज ठरतो. विमानतळावर पहाटे जाताना टॅक्सीवाला अडवणूक करून जास्त भाडं मागतो नी वेळेची गरज म्हणून ते दिलंही जातं. भले तेव्हा आपण मनात चरफडतच तसं करतो. काळ सोकावतच जातो नी आपण 'आमच्या लहानपणी नव्हतं हो असं' म्हणत काळाला दोष देत राहतो.

हा सगळा अवांतर जादा खर्च भागविण्यासाठी माणूस नकळत वेगळ्याच मार्गावर चालू लागतो. जास्त पैसा मिळवण्याची हाव शेवटी नाना आर्थिक अपराध करवते. ह्या मार्गावर जाणं खूप सोपं असतं. पण परतणं कठीण. सुखलोलुप मन अधिकाधिक सुख किंवा आर्थिक बाजूवरची मन:शांती मिळविण्यासाठी जास्तीतजास्त अफाट प्रयत्न करीत राहते नी नंतर त्या सुखाशिवाय जगणं अशक्य होऊन बसतं. दुसऱ्यापेक्षा आपल्याकडे किती आधुनिक वस्तू आहेत हे दाखविण्याची स्पर्धा सुरू होते. भ्रष्टाचार ही वृत्ती आहे. ती जन्मताच खूप प्रमाणात असते की कालांतराने वाढत जाते हे व्यक्तीसापेक्ष आहे. पण रिक्शावाला किंवा टॅक्सीवाला जेव्हा 'हमरस्त्यावरच सोडेन' असा आम्हाला दम देतो तेव्हा आमच्या पिढीची थकलेली पावलं घरापर्यंतचं उरलेलं अंतर पायी चालवणारच नाही ह्या परिस्थितीला शरण जातात नी रिक्शा किंवा टॅक्सीवाल्याला सांगतात- 'मी तुला थोडे जास्त पैसे देईन, पण मला त्या गल्लीतल्या माझ्या उतरण्याच्या ठिकाणापर्यंत ने बाबा..'

हा खरं भ्रष्टाचार आहे? की अत्यंत नाईलाजानं स्वीकारलेला पर्याय आहे? भ्रष्टाचाराची कारणं शोधायला लागल्यावर जाणवतं की हळूहळू गरजच भ्रष्टाचाराला जन्म देत रहाते. असं म्हणतात की कोणत्याही मोठ्या शहरात- विशेषत: मुंबईत- हवेत पैसा असतो. फक्त कुठं नी कसा हात मारायचा हे कळायला हवं. ह्या वर्षी प्राप्तिकर वाचवायला कुठच्या पळवाटा काढायच्या ते आपण शोधलेलेच आहे. पुढच्या वर्षी जास्तीतजास्त कर कसा वाचवायचा नी आपला फायदा शंभरपटीनी वाचवायचा (थोड्या पटींनी आपलं समाधान होतच नाही) त्याचा विचार आत्ताच बरेच लोक करतायत. मग आपण तसं का करायचं नाही?...

....की का करायचं? ह्यापैकी कोणत्या प्रश्नाचं उत्तर आपण शोधायचं आहे हे आपल्यालाच ठरवायचं आहे. भ्रष्टाचाराची ही वृत्ती जोपासायची नसेल तर आपल्या मनातून ह्या वृत्तीचं समूळ उच्चाटन कसं करायचं ते ठरवून त्याप्रमाणे स्वत:चा काही कलमी कार्यक्रम निश्चित करून तो पार पाडायला हवा. नाहीतर स्वत:च्या पोळीवर तूप ओढून घेत भ्रष्टाचारविरोधी मिरवणुकीत खोट्या ऐटीनं सामील होणं थांबणार नाही.

---

(पान २ कॉलम ४ वरून)

३) कलात्मक पाककृती स्पर्धा - घाटलेल्या बेसनाची कलात्मक पाककृतीवर आहे. ही कृती घरून करून आणणे. कै. सुधा नायक, कै. सुशीला जयकर, कै. विनीता अजिंक्य, कै. विमल धुरंधर, कै. मंदाकिनी जयकर आणि कै. मनोरमा धराधर स्मरणार्थ यासाठी पहिले बक्षिस असेल. ४) कै. सुहासिनी वाझकर स्मरणार्थ व श्रीमती उषा कोठारे पुरस्कृत 'तुझ्याविना' या विषयावर काव्यस्पर्धा. कविता करून आणणे. ५) 'स्पर्धांचे युग' या विषयावर महिलांसाठी निबंधस्पर्धा. कै. मालतीबाई कीर्तिकर, कै. सुप्रिया वैद्य, कै. निहारिका कोठारे व कै. लक्ष्मीबाई प्रभाकर स्मरणार्थ ही स्पर्धा असेल. लहान मुलींकरिता 'फुलपाखरू' हा विषय आहे. निबंध घरून लिहून आणणे. स्पर्धकांनी दुपारी ३.३० वाजता येण्याचे आवाहन चिटणीसांनी केले आहे.

## प्रभु तरुण आश्रयदाते

१) सौ. विमल व श्री. माधव नायक,
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर,
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि
कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तिकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिंक्य
१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे,
कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर,
कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे
यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व
कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक

## प्रभुतरुणाची डायरी

### जनन

| | | | |
|---|---|---|---|
| ०८-०२-१३ | सौ. सुमेधा आणि श्री. केतन प्रकाश धुरंधर | कन्या | अंधेरी |

### नारळसाखर दिला

| | | |
|---|---|---|
| २८-०२-१३ | श्री. दिनार हेमंत सेंजित | कु. अनुजा आनंद कोठारे |

### विवाह माणिक महोत्सव

| | | |
|---|---|---|
| ११-०२-१३ | श्री. उल्हास गजानन तळपदे | कु, रश्मी विनायक देसाई |

### मरण

| | | | |
|---|---|---|---|
| ०७-०२-१३ | श्री. प्रशांत रमाकांत धैर्यवान | वय ६८ | पुणे |
| ११-०२-१३ | श्री. उल्हास वामनराव कोठारे | वय ६५ | नालासोपारा |
| १४-०२-१३ | श्रीमती दीपश्री विलास तळपदे | वय ७८ | बोरीवली |
| १४-०२-१३ | कु. कुंदा आनंदराव अजिंक्य | वय ७३ | ठाकुरद्वार |
| २४-०२-१३ | श्रीमती कुसुम मोतीराम कोठारे | वय ८९ | खार |
| २१-०३-१३ | श्री. कुमार (चिंतामणी) गजानन वेलकर | वय ९० | महालक्ष्मी |
| २२-०३-१३ | सौ. मीनल संतोष कोठारे | | |
| २३-०३-१३ | श्रीमती लता (मोहिनी) अनिल विजयकर | वय ९१ | अंधेरी |
| २४-०३-१३ | श्री. सागर (वैभव) दिलीप नवलकर | वय ३९ | ठाणे |
| २४-०३-१३ | श्रीमती कुमुद गजानन राणे | वय ८२ | झावबावाडी |

## प्रभुतरुणास देणगी

❁ सौ. आणि श्री. सुरेंद्र व्यवहारकर यांजकडून त्यांची कन्या सौ. त्वरिता संजय दळवी प्रथम वर्गात एम,बी.ए. झाल्याबद्दल रु. ५०१/-

❁ सौ. रेखा आणि श्री. आनंद गणपतराव कोठारे यांजकडून त्यांची कन्या कु. अनुजा हिचा नारळसाखर दिल्याप्रीत्यर्थ रु. ५००/-

❁ कै. श्रीमती मंजुळा नारायण धराधर यांच्या ५०व्या स्मृतीदिनाप्रीत्यर्थ त्यांचे नातजावई श्री. राकेश सुशील धैर्यवान यांजकडून रु. ५००/-

## अभिनंदन

❁ ऑल इंडिया टेनिस असोसिएशनच्या पासष्ट वयावरील पुरुषांच्या व्हेटेरन् डबल्स टेनिस टूर्नामेंटसमध्ये २०१३चा प्रथम क्रमांक श्री. सुभाष बाळाराम जगन्नाथ त्रिलोकेकर ह्यांनी पटकावला. नवभारत टाइम्स, फ्री प्रेस जर्नल, हिंदुस्तान टाइम्स, इंडियन एक्सप्रेस या वृत्तपत्रांनी १८, १९ मार्चच्या आवृत्तीत या यशाची खास दखल घेतली. अभिनंदन.

❁ सास्स्वत बँकेच्या महाव्यवस्थापक सौ. उर्वशी धराधर यांचा अर्थसंकल्प आणि अर्थव्यवस्थापनावर अभ्यासपूर्ण लेख 'लोकसत्ता'च्या 'चतुरंग' आवृत्तीत प्रसिद्ध झाला. 'देशदूत'तर्फे आयोजित 'अर्थसंकल्प विश्लेषणा'तही १ मार्च रोजी त्यांचा सहभाग होता. 'तिची लक्ष्मी'या पुस्तकाला त्यांची प्रस्तावना आहे. पुस्तक प्रकाशनालाही त्या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. अभिनंदन.

❁ वासंती वर्तक लोकसत्तात 'कुटुंब रंगलय' हे सदर चालवितात. या सदरासाठी त्यांनी ॲड. केतकी जयकर, त्यांच्या कन्या सॉलि. सौ. नम्रता गरूड, त्यांच्या भगिनी सॉलि. लक्ष्मी मानकर अशा तीन पिढ्यांच्या लक्षणीय यशाचा आढावा घेतला. लक्ष्मी मानकर ह्या पाठारे प्रभु ज्ञातीतील पहिल्या सॉलिसीटर आहेत. सौ. केतकी यांच्या कुटुंबातील या स्त्रीरत्नांचे मन:पूर्वक अभिनंदन.

❁ मुंबई विद्यापीठाच्या जर्मन भाषा विभाग आणि मराठी भाषा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने २१,२२ मार्च रोजी 'अन्य भाषकांकरिता मराठी' या विषयावर कार्यशाळा आयोजित केली होती. या अंतर्गत प्रा. सुहासिनी कीर्तिकरांनी एका सत्रात आपले विचार मांडले. तसेच दुसऱ्या सत्राचे सूत्रसंचालन, आभारप्रदर्शनही त्यांनी केले. या कार्यशाळेच्या शेवटी मांडलेल्या प्रस्तावानुसार नवीन अभ्यासक्रम तयार करण्याचे ठरले. त्यात सुहासिनी कीर्तिकरांचा समावेश आहे. 'साहित्य' या त्रैमासिकात त्यांचा लेख प्रसिद्ध झाला आणि त्या लेखाला श्री. राजन खान, किरण येले अशा नामवंतांची दाद मिळाली. 'कवितांगण'या कवितासंग्रहालाही त्यांची छान प्रस्तावना आहे.

❁ आकांक्षा प्रतिष्ठान आणि 'टीपटॉप' (ठाणे)तर्फे महिला दिनानिमित्त तीन दिवसांचा सोहळा आयोजित केला होता. त्यातील एका 'जोड्यांच्या कार्यक्रमा'त सौ. अचला सुभाष देसाई आणि सौ. अनुराधा सीमित देसाई ही सासू-सून जोडी, सौ. अनुराधा आणि कु. अदिती ही आई-मुलगी जोडी, सुहासिनी कीर्तिकर आणि कु. अदिती देसाई ही आजी-नात जोडी यांचा लक्षणीय सहभाग होता. परीक्षकांनी याची खास दखल घेतली. अभिनंदन.


**MAHABALESHWAR**

*COME HERE TO EXPERIENCE NATURE AT ITS BEST WITH*
**JASMINE COTTAGE**





*THE COTTAGE OFFERS 4 SPACIOUS ROOMS . IT PROVIDES ACCOMODATION FACILITIES TO SUIT THE BUDGET OF THE TOURIST*
*ALL THE ROOMS HAVE SERENE ENVIRONMENT AND OPEN SIT-OUT VARANDA WHERE GUESTS CAN SIT AND ENJOY THE PLEASANT BEAUTY OF THE NATURE*

**FACILITIES:**
- Attached bath
- Hot & Cold Running water
- Television with Satellite Connection
- Car Parking
- Large open area for playing outdoor games

**Location:**
It is located near the market in Mahabaleshwar within close proximity of bus stand in the gorgeous land of Mahabaleshwar.

***For Booking Contact:***
***Velkars 9930172689 9220451465***


हे मासिक मुद्रक, प्रकाशक श्रीमती सुहासिनी कीर्तिकर यांनी मालक बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुण करिता मे. स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ, शाह अँड नाहर इंडस्ट्रीयल इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०००१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४००१०२ येथे प्रकाशित केले.

**संपादक: श्रीमती सुहासिनी कीर्तिकर** RNI NO. 14613/67